दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

● वर्ष १६ वे ● अंक ६८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## शुभेच्छा देण्यासाठी निवासस्थानी येऊ नका : लोकनेते रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७० वा वाढदिवस आहे. सध्या सुरू असलेला कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व हितचिंतकांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी निवासस्थानी येऊ नये, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आहे. कोरोनामुळे सर्व व्यवहार ठप्प होऊन जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक जण संकटात सापडलेले आहेत. अशा परिस्थितीत कुणीही मला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी प्रत्यक्ष भेटायला येऊ नये. ज्यांना आपले आशीर्वाद आणि शुभेच्छा द्यायच्या असतील त्यांनी फोनवरून तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून द्याव्यात. सर्वांचे माझ्यावर प्रेम आहे आणि ते वृद्धिंगत होत राहील, असा मला विश्वास असल्याचेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.



# मराठा समाजाला दिलासा ; ठाकरे सरकारचा मोठा निर्णय; १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण कायदा रद्द केल्यापासून पुन्हा एकदा हा मुद्दा चर्चेत आला आहे. यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी अजूनही झडताना दिसत आहेत. मात्र, आता राज्य सरकारने मराठा समाजाला दिलासा देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतल्याची माहिती मिळाली आहे. मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरीमध्ये आर्थिक दुर्बल घटकांच्या १० टक्के आरक्षणाचा लाभ आता घेणार आहे.

मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणारा कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर राज्यात मराठा समाजातून संतप्त प्रतिक्रिया उमटली होती. यानंतर संभाजीराजे यांनी पुढाकार घेत राज्यव्यापी दौऱ्याला सुरुवात केली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून संभाजीराजेंनी अलीकडेच राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. भाजपही याच मुद्द्यावरून ठाकरे



सरकारला घेरण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. मराठा समाजातूनही सरकारबद्दल नाराजीचा सूर असून, ईडब्ल्यूएस प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणीही होत होती. अखेर राज्य सरकारकडून याबद्दलचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य सरकारने याबद्दलचा आदेश काढला आहे. राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मराठा विद्यार्थी आणि उमेदवारांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशात १० टक्के आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग आरक्षण मिळणार असून, या निर्णयामुळे राज्यातील मराठा विद्यार्थी आणि उमेदवारांना १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे.

राज्यात मराठा आरक्षण लागू असताना मराठा समाजाला १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाचा फायदा घेता येत नव्हता, तसा निर्णय सरकारने घेतला होता. आता मात्र मराठा आरक्षण रद्द झाल्यावर मराठा समाजाला एथड आरक्षण लाभ देण्याचा निर्णय सरकारने दिला आहे. यामुळे मराठा समाजाला दिलासा मिळेल, असे सांगितले जात आहे.

## स्वत:चे पाप झाकण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा शिवभोजनाचा बिलाचा चेंडू ट्रेझरीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी हे वादग्रस्त असून शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहचू नये आणि ठाकरे सरकार (महाविकास आघाडी सरकार) कसे बदनाम होईल यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात असे रायगड जिल्ह्यातील जनतेला दिसून येत आहे. मग तो शिवभोजन किंवा जनतेशी निगडीत कोणताही प्रश्न असो यासाठी जनतेला वेठीस धरून महाविकास आघाडीला बदनाम करण्याच्या प्रयत्नात असतात. म्हणूनच शिवभोजन चालकांची बिले ७-८ महिने रखडवून शिवभोजन चालकांना आपण बिले ट्रेझरीमध्ये पाठविली असल्याचे सांगतात.




रायगड जिल्ह्यातील शिवभोजन केंद्रांची बिले ७ ते ८ महिने मिळाल्या नसल्याच्या तक्रारी दैनिक रायगड नगरीकडे शिवभोजन चालकांनी दूरध्वनीद्वारे केल्यावर याची शहानिशा करण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी बोडके यांच्याकडे दैनिक रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा भ्रमध्वनी क्रमांक संपर्क क्षेत्राच्या बाहेर असल्याचे दाखविण्यात आल्यामुळे पोतदार यांनी पुरवठा शाखेतील वरिष्ठ लिपिक दिपक मुळे यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक ८४३९५३८१९५ या क्रमांकावर संपर्क केला. परंतु त्यांचा संपर्क न झाल्यामुळे पोतदार यांनी त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठवून बिलाबाबत चौकशी केली. त्यावेळी मुळे यांनी ट्रेझरी मधील उपस्थिती १५% आहे व त्यामध्ये सुद्धा काही कर्मचारी कोरोनाबाधित असल्यामुळे बिलाला दिरंगाई होत असल्याचे सांगितले. परंतु या साठी अधिक माहिती सहाय्यक लेखाधिकारी पुरवठा शाखा रायगड यांच्याकडे संपर्क करण्यास सांगितले. त्यावेळी मुळे यांनी हरीश डोंगरे यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९५५२०३७५५९ हा दिला. त्या क्रमांकावर पोतदार यांनी संपर्क केला असता डोंगरे यांनी ट्रेझरीमध्ये उपस्थितीचे कारण दाखवून बिलाला विलंब होत असल्याचे सांगितले. याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी पोतदार यांनी सहाय्यक लेखाधिकारी पुरवठा शाखा डोंगरे यांच्याकडे ट्रेझरी अधिकारी यांचा भ्रमणध्वनी क्रमांक मागितला. परंतु डोंगरे यांनी आपणाकडे त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक नाही असे सांगून पोतदार यांना कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक दिला. त्या दूरध्वनी क्रमांकावर पोतदार यांनी संपर्क केला असता कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी आपण साहेबांशी बोलून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक देतो असे सांगितले. त्यामुळे नाईलाजाने पोतदार यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात संपर्क करून ट्रेझरी ऑफिसर फिरोज मुल्ला यांच्या ८५५१०४८७८६ या क्रमांकावर संपर्क केला. त्यावेळी मुल्ला यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की आपल्या कार्यालयात शासकीय कार्यालयातील आलेली कोणतीही बिले तीन दिवसा-पेक्षा जास्त काळ न ठेवता मंजुरी दिली जाते. आमचे कार्यालय हे महाराष्ट्रातील सगळ्यात जलदगतीने काम करणारे एकमेव कार्यालय आहे असे सांगून ते पुढे म्हणाले जिल्हा पुरवठा शाखेतील पुरवठा अधिकारी हे आपली दिशाभूल करीत आहेत, अश्या स्पष्ट शब्दांत सांगितले. त्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी हे आपले स्वतःचे पाप झाकण्यासाठी ट्रेझरीचा उपयोग करीत असल्याने त्यांचे पित्तळ उघडे झाले आहे.

## जिल्हा शल्यचिकित्सक रायगड यांच्या मनमानी व अडवणुकीच्या धोरणामुळे कोव्हीड रुग्णाचे होणार हाल?

**दै.रायगड नगरी । पनवेल**


कोरोनाच्या अतिगंभिर संसर्गजन्य विषाणुच्या आजाराचा संपूर्ण देशात मोठया प्रमाणात प्रादुभाव झाला आहे. त्यानुसार महाराष्ट्र सरकार कडून दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार रायगड जिल्हयात दैनंदिन दाखल रूग्णांवर तात्काळ उपचार करण्याचे दृष्टीने जिल्हा रूग्णालय, तसेच सर्व उपजिल्हा व ग्रामीण रूग्णालयात कोव्हीड सेंटरची स्थापना करण्यात आलेली असून मोठया प्रमाणात रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. सद्यस्थितीत आरोग्य विभागात मोठया प्रमाणात वर्ग-४ ची पदे रिक्त असल्यामुळे, संपूर्ण रायगड जिल्हयातील कोव्हीड सेंटरमध्ये स्वच्छता व रुग्णाची सर्व प्रकारची कामे करणेसाठी मे. ओम साई सुशिक्षित बेराजगोर सहकारी सेवा संस्था, कर्जत याना दिन रू. ४००/- प्रमाणे कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरवठा करणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.

तथापी डौ. सुहास माने, जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड व इतर कर्मचा-याकडून कोव्हीडमध्ये नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा-योना हेतुपुरस्कर शाररीक, मानसिक व आर्थिक त्रास दिला जात असल्याच्या तकारी निर्माण झाल्या आहेत. त्यामध्ये कंत्राटी कर्मचा-याना दैनंदिन सलग १० ते १२ तास सलग काम करावे लागते, नाश्ता व जेवणास वेळ मिळत नाही, आठवडयातून एकही दिवस सुट्टीही दिली जात नाही , एखादा कर्मचारी कोव्हीड कक्षात आरोग्य सेवा पुरवित असताना पाझीटीव्ह झाल्यास त्याचे त्या कालावधीचे वेतनही कापण्यात येते, नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना ओळखपत्र दिले जात नाही. कर्मचा-याचा विमा काढला जात नाही. त्यांना कोणतीही सुरक्षतेबाबतची साधने दिली जात नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत कोव्हीड विभागात काम करण्यास नव्याने कोणीही कर्मचारी तयार होत नाहीत. तसेच सद्यस्थितीत कार्यरत कर्मचारीही काम सोडून जाण्याचे मनस्थितीत असल्याचे कर्मचा-यांनी लेखी ..../२

## प्रेयसीला केटामाईन इंजेक्शन देवून खुन करणाऱ्या आरोपीस अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लग्नाचा तगादा लावणाऱ्या प्रेयसीला केटामाईन इंजेक्शन खुन करणाऱ्या प्रियकारास पनवेल शहर पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे.



पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील नियोजीत विमानतळाच्या जागेत कोल्ही कोपर गांवच्या दत्त मंदिराचे पुढे रस्त्याच्या कडेला ३५ ते ४० वर्षे वयाचे अनोळखी महिलीचे प्रेत मिळाल्याने अकस्मात मृत्यू रजि.नं. ६३/ २०२१, फौजदारी प्रकीया संहीता कलम कलम १७४ अन्वये दाखल करण्यात आला होता. सदरचे प्रेत हे महीलेचे असल्याने पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, पोलीस सहआयुक्त डॉ.जय जाधव, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील व सहा. पोलीस आयुक्त, नितीन भोसले-पाटील यांनी सदर गुन्ह्याचा सखोल तपास करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार चौकशी चालु असताना इसम रमेश शिवराम ठोंबरे, वय ३६ वर्षे, धंदा-चालक, रा. नानोशी, ता. पनवेल जि. रायगड यांनी सदर महीलेचे प्रेत ओळ-खून ते त्यांच्या बहीणीचे असल्याचे सांगुन तिचे मृत्यू बाबत संशय व्यक्त केला. दरम्यान रिक्षाचालक लक्ष्मण नाना गुदरे रा. तुरमाळे यास तुरमाळे गावाजवळील रोडच्या बाजुला मयत महीलेचे आधारकार्ड, पॅनकार्ड, पर्स व कपडे इत्यादी साहीत्य असलेली पिवळ्या रंगाची प्लास्टीक पिशवी मिळुन ..../२

## पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते म्हसळा ग्रामीण रुग्णालयात 30 ऑक्सिजन बेडचे उदघाटन

### स्वतंत्र वार्डसह १२ ऑक्सिजन बेड महिलांसाठी राखीव



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोरोना प्रादुर्भावावर मात करण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत व सहकार्य करीत असतानाच रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे सातत्यपूर्ण सक्रिय सहभाग घेत नागरिकांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आहेत. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत म्हसळा तालुक्यात रुग्ण संख्या झपाट्याने वाढत गेली आणि आरोग्य सेवा मिळणेसाठी एकच धावपळ उडाली त्यातच अनेक रुग्णांना ऑक्सिजनची गरज भासु लागली. पालकमंत्री आदिती तटकरे यांनी शासन स्तरावर जलदगतीने म्हसळा ग्रामीण रुग्णालयासाठी ३० खाटांचे ऑक्सिजन बेडची मंजुरी मिळवून त्याचे उदघाटन आज दिनांक ३१ मे रोजी त्यांच्या हस्ते करण्यात आले. उपलब्ध ३० बेड पैकी १२ ऑक्सिजन बेड महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी माहिती देताना सांगितले.

म्हसळा ग्रामीण रुग्णालयात कोव्हीड -१९ डेडिकेटेड हेल्थ केअर सेंटर कार्यान्वित करण्यात येणार असल्याची घोषणा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी महिन्याभरापूर्वी जाहीर केली होती आणि अवघ्या १५ दिवसांत ऑक्सिजन बेड सह सर्व त्या सोयींनीशी मुबलक आरोग्य सेवा उपलब्ध करून ..../२




# उकळत्या तेलाचे चटके

विविध संस्कृतींमधील नरकाच्या ज्या कल्पना आहेत; त्यातल्या काही काल्पनिक कथांमध्ये नरकातल्या छळाचा एक प्रकार म्हणजे पापी जिवांना उकळत्या तेलात टाकण्याचा आहे. पण या कथा लिहिल्या गेल्या तेव्हा कदाचित फक्त खाद्यतेलच वापरात असेल. खनिज तेलाचा वापर चीनमध्ये दोन हजार वर्षांपासून होत असला तरी तो सर्रास व्हायला पुढे बरीच शतके लागली. मात्र, उकळत्या तेलाच्या या दंतकथेत संदिग्धता राहू नये, यासाठी केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेल ही इंधनतेले आणि शेंगदाणा, करडई, सोयाबीन, पामतेल, मोहरी, सूर्यफूल आदी खाद्यतेले अशी दोन्ही तेले उकळवून त्यात गरीब बिचाऱ्या भारतीयांना फेकून दिले आहे. 'तेलाच्या किमती भडकल्या' असे मथळे छापून येतात, तेव्हा काही वाचकांच्या मनात उगाच शंका निर्माण होते की, म्हणजे पेट्रोल की शेंगदाणा तेल? पण भारतीय वाचकांच्या मनातला हा संभ्रम दूर केल्याबद्दल केंद्र सरकारचे सहनशील भारतीयांनी ऋणीच राहायला हवे. नरेंद्र मोदी सरकारला आता सात वर्षे पुरी झाली आहेत. इतका काळ हे पद सांभाळणारे ते केवळ चौथे पंतप्रधान आहेत. पंतप्रधान होण्यापूर्वी त्यांच्या ज्या आक्रमक प्रचारसभा होत, त्यांत पेट्रोलचे चढे भाव हा त्यांचा फार आवडता मुद्दा असे. कसलेल्या कथेकारी बुवांसारखे मोदी तेव्हा या भाववाढीचे आख्यान लावत. पण तेव्हाचे भाव हे चिंचोके वाटावेत, इतके आज हे भाव भडकले आहेत. आपण सात वर्षांपूर्वी काय बोलत होतो, याचा मोदींना एव्हाना विसर पडला असेल. पण निदान पूर्वी राजे-महाराजे आपल्या वाढदिवशी प्रजेसाठी दौलतजादा करीत. तसे केंद्र सरकारने या निमित्ताने काही केंद्रीय कर कमी करायला हवेत. करोनाने पोळून निघालेल्या भारतीय नागरिकांचा अशी सवलत मिळविण्याचा रास्त हक्क आहे. केंद्र सरकारने तेल भाववाढीचा जुलूम थोडा आटोक्यात आणावा. केंद्र सरकारने २०१९-२० या वर्षात इंधन तेलावरील करातून २.२ लाख कोटी रुपये जमविले होते. पुढच्या वर्षी त्यात एकदम ७७ टक्क्यांची भर पडून केंद्र सरकारने २०२०-२१ या आर्थिक वर्षात ३.९ लाख कोटी रुपये तिजोरीत भरले. करोना काळ असल्याने देशभरात पेट्रोल आणि डिझेलचा वापर जवळपास ११ टक्क्यांनी घटला. तरीसुद्धा, इतका प्रचंड महसूल केंद्राने गोळा केला आहे. करोनाकाळात केंद्राने बऱ्याच कल्याणकारी योजना राबविल्या. कोट्यवधी खात्यांमध्ये थेट पैसा जमा केला, हे खरे आहे. मात्र, आता करोनाची मगरमिठी काहीशी सैल होत असताना हे भाव असेच चढे राहतील तर अर्थचक्राला गती न येता खीळ बसेल, हे निश्चित. करोनाकाळात इतर करसंकलन कमी झाले आहे. शिवाय, इंधनावरचा कर जमा करणे हे अत्यंत सोपे असते. मात्र, याचा अर्थ आयुष्य पुढे रेटण्यासाठी इंधन वापणाऱ्या कोट्यवधी नागरिकांना पिळूनच काढले पाहिजे, असे नाही. केंद्राने भाव वाढविले की, त्या भावांच्या मागे लपून राज्य सरकारेही आपले कर कमी करत नाहीत. राजस्थान, आसाम, बंगाल आणि मेघालय या केवळ चार राज्यांनी काही काळापूर्वी आपले कर कमी केले होते. त्यातही, दोन राज्यांमध्ये निवडणुका होत्या. महाराष्ट्रासह सर्वच राज्य सरकारांनी इंधन तेलांच्या भाववाढीचे सगळे खापर केंद्र सरकारवर न फोडता आपला कर काही प्रमाणात कमी करणे आवश्यक आहे. एकीकडे उत्तम सार्वजनिक वाहतूक द्यायची नाही आणि दुसरीकडे, करवाढीने नागरिकांचा खिसा कापत राहायचा, असा भारतीयांचा दुहेरी छळ केला जात आहे. करोनाकाळात मागणी कमी असल्याने भाज्या, धान्ये, खाद्यतेले किंवा इतरही महागाई काही प्रमाणात कमी होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात, हे सर्व भाव वाढत आहेत. या पदार्थांची वाहतूकच महाग झाली, हे त्याचे एक कारण आहे. खाद्यतेलांची महागाई तर कल्पनेच्या पलीकडची आहे. गेल्या वर्षीच्या मे महिन्याशी तुलना केली तर शेंगदाण्यापासून मोहरीच्या तेलापर्यंत सर्व तेले दीडपट, दुपटीने भडकली आहेत. जगभर खाद्यतेले भडकली, खाद्यतेलांची जहाजे अनेक महिने अडकून पडली, पामतेल पुरविणाऱ्या मलेशियाशी संबंध बिघडले आणि जगभरातील वाढत्या मागणीचा दबाव आला, ही कारणे तर आहेतच. मात्र, तेलबिया आणि खाद्यतेले यांच्याबाबत आपण स्वयंपूर्ण व्हायला हवे, ही दृष्टीच मोदी सरकार हरवून बसले आहे. राजीव गांधी यांनी 'टेक्नॉलॉजी मिशन'मध्ये तेलबियांचा समावेश केला, त्याला ३५ वर्षे उलटली. मात्र, हे मिशन सातत्याने चालवायचे असते, याचा केंद्राला विसर पडला आहे. खरे तर, खाद्यतेले ही जीवनावश्यक वस्तूंमध्ये मोडतात. याचा अर्थ, केंद्र सरकार या वस्तूंच्या किमतींचे नियंत्रण करण्यासाठी हस्तक्षेप करू शकते. तसाही हस्तक्षेप मोदी सरकारने अजून केलेला नाही. महागाई कमी करा, ही 'जन की बात' आहे. कधी कधी तीही ऐकायला हरकत नाही.

## महावितरणचे अंडरग्राऊंड केबल टाकण्याचे विनापरवानगी काम

### भोराव ते हावरे रस्त्यावर साचली चिखल-पाण्याची अनेक डबकी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात गेल्या दोन तीन दिवस अवकाळी पावसाने सातत्य ठेवले असून या सततच्या पावसामुळे भोराव ते हावरे या सप्तक्रोशीतील रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून अनेकठिकाणी डबकी साचल्याचे दिसून आले. दरम्यान, महावितरणने सप्तक्रोशी भागात अंडरग्राऊंड केबल टाकण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परवानगीविनाच केल्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे दिसून येत आहे.याप्रश्नी थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या न्यासाकडून नियुक्ती झालेले जिल्हा दारूबंदी समिती सदस्य अब्दुलहक खलफे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता व्ही.आर.बागुल यांची भेट घेऊन महाड विभागाकडे हा रस्ता वर्ग केल्यानंतर रस्त्याच्या दर्जा व गुणवत्तेकडे सपशेल दूर्लक्ष झाल्याची तक्रार केली आहे. मात्र, याप्रश्नाची दखल न घेता बागूल यांनी सदरचा प्रश्न महाड विभागाच्या अख्त्यारीत असल्याने तिकडे दाद मागावी, असे सुचविले आहे.



पोलादपूर तालुक्यातील भोराव ते धारवली हा रस्ता प्रजिमा ३९ हा सध्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या महाड विभागाकडे नं. ४६ नुसार अखत्यारीत येत असून या रस्त्याच्या संपूर्ण दुरूस्तीकरणाची गरज असल्याने धारवली सप्तक्रोशी ग्रामविकास समितीतर्फे मोर्चा आणि अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा दारूबंदी समिती सदस्य अब्दुलहक खलफे यांनी उपोषणाचा इशारा दिला होता. स्थानिक ग्रामस्थांचा या उपोषणाला साखळी उपोषणाने पाठिंबा देण्याचा ठराव सप्तक्रोशी संघर्ष समितीचे निमंत्रक दिनानाथ तथा दादा महाकाळ यांच्या धारवली येथील नम्रता निवासस्थानी झालेल्या बैठकीत कृष्णा नांदविकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला होता.

स्थानिक जनतेच्या मागणीनुसार तसेच आ.गोगावले यांच्यासोबत ३१ जानेवारी २०१४ ला झालेल्या चर्चेनुसार भोराव सवाद हावरे रस्त्याच्या लांबीपैकी २० ते ६० किमी रस्ता यापूर्वीच पोलादपूर उपविभागाकडे वर्ग करण्यात आला असून या चर्चेनंतर ०० ते २० किमी या अंतराचा रस्ताही पोलादपूर उपविभागाकडे वर्ग करण्यात आला. यानंतर या रस्त्याच्या कामाचे भुमिपूजन होऊन काम सुरू झाले. तथापि, या कामाचा दर्जा निकृष्टच राहिल्याने गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याची उंची वाढवूनदेखील रस्ता पावसाळ्यात पाण्याखाली राहून रस्त्याचे नुकसान झालेले दिसून आले आहे.

गेल्या दोन चार दिवसांपासून पाऊस सतत पडत असल्याने भोराव ते हावरे या रस्त्यावरील अनेक खड्डे व उंचवटे यांच्यामुळे रस्त्याची अवस्था फारच बिकट झाली असून चारचाकी व तीनचाकी वाहनांसाठी तसेच दुचाकीस्वारांसाठी या रस्त्यावरील वाहतूक डोकेदुखीची झाली आहे. पोलादपूर तालुक्यात असूनही महाड उपविभागाकडे वर्ग झालेल्या रस्त्याच्या सद्यस्थितीतील खड्डे आणि उंचवट्याच्या अवस्थेकडे कोणी लक्ष द्यायचे आणि कोणी पाठपुरावा करायचा, याबाबत प्रश्न निर्माण होऊन रस्त्याचे रूपांतर अनेक खाचखळग्यांच्या डबक्यांमध्ये झालेले अवकाळी पावसामुळे दिसून आले आहे. यातच महावितरणकडून अंडरग्राऊंड केबल टाकण्याचा पर्याय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परवानगीविनाच करण्यात आल्याचे यावेळी अब्दुलहक खलफे यांनी निदर्शनास आणून दिल्याने बांधकाम विभागाने महावितरणला नोटीसही बजावली आहे. पावसाळ्यात मंजूर रस्त्याचे काम होणे शक्य नसल्याने तातडीची बाब म्हणून रस्त्यावरचे खड्डे तात्पुरते बुजविण्याची मानसिकता सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बामणे यांनी दर्शविली आहे.

पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे डेप्युटी इंजिनियर व्हि.आर.बागूल आणि महाडचे एक्झीक्युटीव्ह इंजिनियर रत्नाकर बामणे यांच्यामध्ये खात्यांतर्गत एकोपा दिसून आला तरी या कामाचे बारा वाजण्यामागे यापुर्वीची यंत्रणाच कारणीभूत असल्याचे पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे डेप्युटी इंजिनियर व्हि. आर.बागूल यांनी अब्दुलहक खलफे यांना चर्चेदरम्यान सांगितल्याने सप्तक्रोशीतील या रस्त्याच्या दुरूस्तीचा चेंडू महाड विभागाच्या अंगणात पोहोचला आहे. अशीच टोलवाटोलवी सुरू राहिली तर सप्तक्रोशीतील ग्रामस्थांना यंदा पावसाळ्यात म्हाप्रळ भोर पंढरपूर रस्त्यावर येण्यासाठी विनाकारण नरकयातना सोसाव्या लागणार आहेत.

## विनापरवाना रस्ता खोदकाम केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोणतीही परवानगी न घेता बीएसएनएलची केबल टाकण्याकरता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर खोदकाम केल्याप्रकरणी ठेकेदारावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचा रस्ता दांड फाटा, तूराडे- आपटा, खारपाडा राज्यमार्ग क्रमांक १०७ हा मुख्य रस्ता आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता धनाजी टिळे हे दिघाटी- केळवणे येथे जात असताना त्यांना रस्त्यावर खोदकाम करीत असल्याचे दिसून आले. खारपाडा टोल नाका, मुंबई गोवा हायवे पासुन उजव्या बाजूला आपटा गावाच्या दिशेने सात किमीचा मुख्य डांबरी रस्ता आणि साईड पट्टीचे खोदकाम केलेले असून ते बुजवून १०० मीटर खोदून बीएसएनएलचे केबल टाकण्याचे काम चालू होते.

यावेळी खोदकाम करणार्या कामगारांकडे चौकशी केली असता ठेकेदार फारुख बागेवाडी यांचे केबल टाकण्याचे काम सुरू असल्याचे समजले. त्याने पीडब्ल्यूडी खात्याची रस्ता खोदकाम करण्याची परवानगी घेतली नाही. त्यामुळे मुख्य डांबरी रस्ता आणि साईड पट्टी खोदून अंदाजे तीन लाख रुपयांचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नुकसान केले आहे. रस्त्याचे नुकसान करून वाहतुकीस अडथळा आणि धोका निर्माण होईल अशा स्थितीत खोदकामाचे साहित्य आणि काम करताना दिसून आले म्हणून बीएसएनए-लचे ठेकेदार फारुक बागेवाडी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मुरुड तालुक्यातील विहूर गावाजवळ सापडला मृत भेकर प्राणी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्याला लागूनच जैवविविधतेने नटलेले फणसाड अभयारण्य, गारंबी सारखे घनदाट जंगल आ-हेत, तेथे सांबर, भेकर, रानडुक्कर, ससे, बिबटे सारखे प्राणी भरपूर प्रमाणात आढळतात, तुरळक प्रसंगीच तालुक्यातील काशीद , नांदगाव, मुरुड परिसरात सांबर, भेकर मृत अवस्थेत सापडल्याची नोंद आहे, नुकताच सोमवारी मुरुड तालुक्यातील विहूर बौध्दवाडी जवळ डोंगरालगत मोकळ्या जागेत एक भेकर हा प्राणी मृत अवस्थेत असल्याची माहिती पक्षी ,प्राणी प्रेमी संदीप घरत यांना मिळताच त्यांनी मुरुड चे आर एफ ओ प्रशांत पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी फॉरेस्ट गार्ड कराडे व इतर टीम सोबत घटनास्थळी भेट देऊन त्या मृत भेकर ची पाहणी केली, सदरच्या भेकरावर कोणत्याही प्रकारची जखम आढळून आली नाही, फक्त त्याच्या तोंडातून रक्त आल्याचे दिसले , रात्रीच्या वेळी कुत्र्यांनी ग्रुपने पाठलाग करून त्याच्यावर हल्ला केला असावा असा अंदाज असल्याचे फॉरेस्ट ऑफिसर प्रशांत पाटील यांनी सांगितले, अधिक तपास आर एफ ओ मुरुड करीत असून त्या मृत भेकराचा पंचनामा करून त्याला मोरे गावाजवळील फॉरेस्टच्या जागेत पुरण्यात आले आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त अबोली महिला रिक्षा चालक संघटनेच्या महिलांना जीवनाश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाची साखळी तोडण्यासाठी सर्वत्र लॉक डाऊन सुरु आहे. अशामध्ये सर्वसामान्यांच्या अडचणीत वाढच होताना दिसत आहे. लॉकडाऊनमुळे असलेली उत्पन्नाचे सर्व मार्ग बंद झालेले आहेत. यामध्ये महिला रिक्षाचालकांवरही मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. याबाबत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी संपर्क साधून मदत करण्याचे आवाहन केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही तातडीने जीवनावश्यक वस्तूंचे कीट या संघटनेच्या महिलांकरीता उपलब्ध करुन दिले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल तर्फे सर्व रिक्षा अबोली चालक महिलांना राजीव गांधीं मैदानात धान्याचे वाटप करण्यात आले. यावेळी अबोली रिक्षा महिला चालक संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या सर्व महिलांना धान्य देण्यात आले. त्यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत उपस्थित होते तसेच पनवेल, कळंबोली, कामोठे, कल्याण व डोंबिवलीच्या रिक्षा चालक महिलांना जीवनाशक वास्तूंचा वाटप करण्यात आले. ही मदत मिळाल्याबद्दल अबोली महिला रिक्षा चालक संघटनेतर्फे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानण्यात आले.



## वेद फाऊंडेशन चित्रकला स्पर्धा समितीत उत्तम तरकसे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वेद फाउंडेशन या नोंदणीकृत संस्था द्वारा आयोजित माझे आवडते चित्र या स्पर्धेच्या आयोजन समिती सदस्यांची नुकतीच मुंबईमध्ये घोषणा करण्यात आली. यामध्ये नवी मुंबई आयुक्तालयात कार्यरत असणारे पोलीस अधिकारी उत्तम तरकसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये सचिव सौ माधुरी कुलकर्णी, सदस्य उत्तम तरकसे, यांसमवेत सौ मंजू सराठे, विलास देवळेकर, मंगेश रासम, सौ नम्रता मटकर, सौ सोनल गांधी या निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माझे आवडते चित्र या उपक्रमामध्ये ३ देशातील दोनशेहून अधिक बालके, तरुणी, दिव्यांग तथा विशेष व्याधीग्रस्त बालकांनी आपला सहभाग नोंदविला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मनमानी व अडवणुकीच्या धोरणामुळे कोव्हीड रुग्णाचे होणार हाल?

तकार संस्थेकडे केलेली आहे. तसेच मे. ओम साई सुशिक्षित बेराजगोर सहकारी सेवा संस्था, कर्जत यानीही कर्मचा-याचे दरमहा मासिक वेतन शासनाकडून अनुदान उपलब्ध असूनही डा. सुहास माने यांचेकडून पैसे घेतल्याशिवाय दिले जात नाही अशा प्रकारची लेखी अतिगंभिर तकार आरोग्य विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे तसेच मा.जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे केली असून डौ. माने यानी या संस्थेची कोव्हीड व्यतिरीक्त इतर देयकेही पैसे न दिल्यामुळे गेली ७ ते ८ महिन्यापासून थकीत ठेवल्याचे नमुद करून कोव्हीड विभागाची सर्व कामे दिनोक ०१ जून २०२१ रोजी पासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सद्यस्थितीत कोरोना विषाणूचा मुकाबला करणेसाठी केंद्र शासन, राज्य शासन , जिल्हा प्रशासन व राज्यकीय प्रतिनिधी अहोरात्र काम करीत असून आरोग्य विभागातील डा. सुहास माने सारखे अधिकारी पैसे कमविण्यासाठी झटत असल्याचे दिसून येते. ही अत्यंत गंभिर बाबत आहे. त्यामुळे संपूर्ण रायगड जिल्हयातील कोव्हीड विभागातील रुग्णांचे हाल न होण्याचे दृष्टीने प्रशासनाने तसेच राज्यकीय पदाधिका-यांनी या प्रकरणावर तात्काळ कार्यवाही करून कंत्राटी कर्मचा-यांचे प्रश्न प्रथम प्राधान्याने साडवावेत व कोरोना रुग्णाच्या आरोग्याला प्रथम प्राधान्य द्यावे अशी मागणी होत आहे.

## प्रेयसीला केटामाईन इंजेक्शन देवून खुन करणाऱ्या आरोपीस अटक

आली होती. त्याअनुषंगाने मयताचा भाऊ रमेश ठोंबरे यांस पोलीस ठाण्यात बोलावले. त्याने सदर साहीत्य त्याचे बहीणीचे असल्याचे सांगीतले. तसेच तुरमाळे गावात राहणारा व पटेल हॉस्पीटल, पनवेल येथे वॉर्ड बॉय म्हणुन कामास असणारा चंद्रकांत गायकर नावाच्या इसमाबरोबर संबंध असल्याचे व त्यांचा काही दिवसांपुर्वी फोनवर बोलतांना वाद झाल्याची माहीती दिली. त्याअनुषंगाने चंद्रकांत गायकर यास पोलीस ठाण्यात चौकशीकामी बोलावुन त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली देवुन सांगीतले की, सदर महीले सोबत त्याचे मागील ६ महीन्यांपासुन प्रेमसंबध होते. तथापि तिला गंभीर आजार होता. तरी देखील ती लग्न करण्याचा आग्रह करून नेहमी वाद घालत होती व सतत धमकी देत होती. त्यामुळे तिच्या त्रासाला कंटाळुन त्याने तिला जीवे ठार मारण्याचे उद्देशाने पुर्व तयारी करून तिला आजारातुन बरे होणेसाठी इंजेक्शन देतो असे सांगुन नियोजित विमानतळाचे जागेत नेवून चार वेगवेगळे इंजेकशन्स व केटामाईन हे विषारी इंजेक्शन आयव्ही इंट्राकंथट्वारे देवुन जिवे ठार मारले. तिची ओळख पटु नये व गुन्हयामध्ये कोणताही पुरावा मिळु नये म्हणुन तिच्याजवळील मोबाईल व पिशवी फेकुन देवुन निघुन गेला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणेचे वपोनि अजयकुमार लांडगे व पोनि (गुन्हे) संजय जोशी यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि अनिल देवळे, सपोनि हुल्गे, पोउपनिरी सुनिल तारमळे, पोहवा रविंद्र राउत,पोहवा वाघमारे, पोशि विवेक पारासुर, पोशि युवराज राऊत, पोशि सुनिल गर्दनमारे, पोना परेश म्हात्रे, पोना विनोद पाटील,पोशि यादवराव पुले, पोना पंकज पवार, पोना गणेश चौधरी, पोशि खेडकर व पोशि भगवान साळुंखे यांनी केली आहे.

## म्हसळा ग्रामीण रुग्णालयात ३० ऑक्सिजन बेडचे उदघाटन

दिल्या बद्दल म्हसळा वाशिय नागरिक समाधान व्यक्त करून ना.आदिती तटकरे यांना धन्यवाद देत आहेत. उदघाटना वेळी दोन मोबाईल ऑक्सिजन व्हेंटिलेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याच बरोबर रुग्णालयात कोव्हीड बाधीत रुग्णांसाठी अधिक बेडची उपलब्धता करण्यात येणार आहे. दवाखान्यात ४ ऑक्सिजन कॉन्स्स्ट्रेटर उपलब्ध असुन अधिक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगितले. पावसाळ्यात विज खंडित होण्याची शक्यता असते तो प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी जनरेटर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगितले. रुग्ण सेवे साठी सर्वोतोपरी आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. पालकमंत्री म्हसळा तालुक्याच्या दौऱ्यावर आल्या असता प्रथम त्यांनी म्हसळा तालुक्यातील चिखलप आदिवासीवाडी येथे उपस्थित राहून रायगड जिल्हा परिषद व स्वदेश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फिरते लसीकरण व्हॅनचे उदघाटन केले त्याच बरोबर म्हसळा ग्रामिण रुग्णालय आणि खामगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून दिलेल्या १०२ जननी सुरक्षा अंतर्गत रुग्णवाहिका त्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आल्या त्याच वेळी ना.आदिती तटकरे यांनी दोन दिवसांत ऑक्सिजन बेड कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे सांगितले होते. त्या नुसार ते कृतीत आणले आहे. ऑक्सिजन बेडच्या उदघाटन कार्यक्रमाला पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या समावेत प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार शरद गोसावी, पक्षाचे जेष्ठ नेते अलीशेट कौचाली, तालुका अध्यक्ष समीर बनकर, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले यांच्यासह आदी मान्यवर कार्यकर्ते, शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ढगांच्या गडगडाटासह पावसाच्या हलक्या सरी

**दै.रायगड नगरी । वाकण**

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात उकाड्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. त्यातच मध्यतरी तौक्ते चक्रिवादळाच्या दरम्यान झालेला पाऊस व त्यानंतर वातावरणात वाढलेली प्रचंड हिट यामुळे ऊकाड्याने नागरीक हैराण झाले होते. परंतु आज दुपारच्या सुमारास सुकेळी परिसरामध्ये पावसाच्या हळक्या सरींनी वातावरणात गारवा आणुन नागरिकांना काही काळ का होईना उकाड्यापासुन दिलासा दिला आहे. आज दुपारच्या सुमारास सुकेळीसह वाकण, बाळसई, वांगणी, आमडोशी परिसरामध्ये झालेल्या पावसाच्या हळक्या सरींनी वातावरणात गारवा निर्माण केल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसत होते. काहींना तर पावसात भिजण्याचा मोह आवरता आला नाही. अनेकांनी पावसामध्ये मनसोक्त भिजुन थोड्याफार प्रमाणात आपली उकाड्यापासुन सुटका केली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
(हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या **मौजे-ओवळे, निवाडा यु.के. क्र.२१० मधील स. नं. २०/१ ही जमीन खातेदार धोंडू धर्मा गायकवाड, महादुबाई मारुती पाटील व सीताबाई राम म्हात्रे** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना **पुष्पकनोड येथील भूखंड क्र. १२९, सेक्टर- ३, क्षेत्र-२९० चौ. मी.** चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता खातेदार **धोंडू धर्मा गायकवाड, महादुबाई मारुती पाटील व सीताबाई राम म्हात्रे** यांनी त्यांना वाटपित झालेला **पुष्पक नोड येथील भूखंड क्र.१२९, सेक्टर-३, क्षेत्र-२९० चौ.मी.** या भूखंडाबाबत दुय्यम निबंधक पनवेल नोंदणी क्रं. पवल-३-११३४९/२०२० दिनांक-०१/१२/२०२० यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असुन सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपीत झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत :-

| निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहुन घेणार (I) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहुन देणार (ii) |
|---|---|
| १) श्री. धोंडु धर्मा गायकवाड | ०१. श्रीमती महादुबाई उर्फ आनंदीबाई मारुती पाटील<br>०२. श्रीमती सिताबाई राम म्हात्रे |

उपरोक्त हक्कसोडपत्रानूसार सिडकोकडून केवळ टेबल क्रं. (i) मध्ये नमूद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत.
त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.
तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**
तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई-४००६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०८८/२०२१-२२


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## घरात झोपलेले असताना मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरात झोपलेले असताना अज्ञात इसमाने आत प्रवेश करून ३७ हजार रुपयांच्या ३ मोबाईलची चोरी केली आहे. चोरा विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राईम अपार्टमेंट, सेक्टर ७, खारघर येथे राहणाऱ्या वर्षा निर्मळ या रात्री जेवण करून बेडरूममध्ये झोपी गेल्या होत्या. अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून ३७ हजार रुपयांच्या ३ मोबाईलची चोरी केली.

## कॉ.सुरेश कोशे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कम्युनिस्ट पक्षाचे कामगार नेते कॉ. सुरेश दत्तात्रय कोशे यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा अभिजीत, मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

ग्रँडवेल कंपनीत त्यांनी १९७१ पासून कामाची सुरुवात केली. कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी आंदोलने, मोर्चे काढले. ग्रँडवेल कंपनीतील १९८३ च्या संपात त्यांचे मोठे योगदान आहे. कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी सहकारी पध्दतीने कामगार वसाहत उरण येथे स्थापित केली व या वसाहतीचे सचिवपदी स्थापना झाल्यापासून काम केले. आयुष्यभर कामगार व श्रमिक यांच्यासाठी झटले. उरण तालुका सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या खजिनदारपदी त्यांनी काम पाहिले. उरण तालुक्यातील गृहनिर्माण संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी काम केले. त्यांच्या जाण्याने समाजाची मोठी हानी झाली आहे.

## सुधागड तालुक्यात ९ कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात रविवारी (ता.३०) ९ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ९ जणांनी कोरोनावर मात केली आहे. सध्या तालुक्यात कोरोनाचे ७५ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली. तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ११२९ रुग्ण झाले असून १००० रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ५४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

# खांदा कॉलनीतील पाणीटंचाईचे ग्रहण कधी सुटणार? संतप्त नागरिकांचा सवाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या दोन महिन्यांपासून पनवेलमधील खांदा कॉलनी येथील नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा प्रश्न भेडसावत असून नागरिकांचे पाण्याविना अतोनात हाल होत आहेत. ही बाब सिडको अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणून दिली असता तेवढ्यापुरते १५ ते २० मिनिटे पाणीपुरवठा केला जातो. त्यानंतर परिस्थिती पुन्हा जैसे थे.!

गेले १५ दिवस खांदा कॉलनी परिसरात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. काही ठिकाणी कमी दाबाने पाणी येत आहे तर काही ठिकाणी पाण्याचा एक थेंबही नाही. त्याच बरोबर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाईप लाईनला लागलेले गळतीचे ग्रहण कधी दूर होणार? असा सवाल संतप्त नागरिक करीत आहेत.



खांदा कॉलनीतील नगरसेविका सीता–ताई पाटील यांनी काही दिवसांपूर्वी सिडको अधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाई विषयी कल्पना दिली असता त्यांनी पाण्याची अडचण लवकरच दूर करू असे आश्वासन दिले होते. परंतु अद्यापही पाण्याची अडचण त्याच अवस्थेत असून नागरिकांचे पाण्याविना हाल होत आहेत. नगरसेविका सीताताई पाटील यांनी या पाणी प्रश्नाबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत तसेच

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सोबत देखील यापूर्वी पत्रव्यवहार केला आहे. सदर बाब सिडको अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणून दिली असता लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करू असे आश्वासन सिडको अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे. मात्र २ महिने झाले तरीही भीषण पाणीटंचाई असून नागरिकांचे हाल होत आ–हेत. पाणी हे मानवी जीवनासाठी अत्यावश्यक असल्याने एकवेळ धान्य नको पण पाण्याची सोय करा अशी मागणी खांदा कॉलनीतील नागरिक करत आहेत. गेले १५ दिवस खांदा कॉलनी परिसरात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. परंतु काही मोठ्या टॉवर्समध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्यामुळे एका टँकरद्वारे केला जाणार पाणीपुरवठा मुबलक नसून दैनंदिन वापरात येणारे पाणी पुरत नसल्यामुळे प्रचंड गैरसोय होत आहे.

# माथेरानमध्ये अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमध्ये हर हर चांगभले धनगर समाजाच्या वतीने अहिल्याबाई होळकर यांची जयंती कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अगदी साधेपणाने साजरी करण्यात आली.

महात्मा गांधी मार्गावरील अहिल्याबाई होळकर चौकातील होळकर यांच्या नामफलकास धनगर समाजाचे जेष्ठ सदस्य रामचंद्र (बुवा)यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला तर इंदिरा गांधी नगर येथील समाजमंदिरात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे,जेष्ठ कार्यकर्ते संतोष आखाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी धनगर समाजाच्या महिला वर्ग त्याचप्रमाणे सर्व धनगर बांधवांनी शासनाच्या नियमांचे पालन करत ही जयंती अत्यंत साधेपणाने साजरी केली आहे.

यावेळी नगरपरिषदेचे सभागृह गटनेते प्रसाद सावंत, नगरसेवक शकील पटेल, नरेश काळे, सिताराम कुंभार, मारुती कोकळे, शिवमल्हार ग्रुपचे युवक शैलेश ढेबे, करन जानकर, भावेश झोरे, निलेश ढेबे, दीपेश ढेबे, ऋषीकेश झोरे, प्रशांत ढेबे, संतोष ढेबे यांसह अन्य उपस्थित होते.



# जातीय सलोखा व इतर समस्यांबाबत मिटींग संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा पोलिस ठाणे हद्दीतील सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी, स्थानिक सर्वधर्मीय नागरिक, शांतता कमिटी सदस्य तसेच ज्येष्ठ नागरिक यांची जातीय सलोखा व इतर समस्यांबाबत मिटींग घेतली असून त्यांना प्रथमतः कोविड आजाराचा प्रादुर्भाव व बचावा संदर्भातील पाळावयाचे नियम व उपाययोजना तसेच महानगरपालिका यांनी दिलेले निर्देश यांचे बाबत तळोजा पोलिस ठाणेचे वपोनी. काशिनाथ चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.



तसेच हद्दीतील वाढत्या चोरी व इतर गुन्हे बाबत सूचना दिल्या. समाजातील लोकांच्या धार्मिक भावना जोपासण्याबाबत तसेच आपापसात समन्वय राखून गोडीगुलाबीने रहाणे बाबत पोलिसांनी मार्गदर्शन केले. हद्दीत वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण बघता काय काय उपाययोजना करावयाच्या तसेच करायच्या आहेत याबाबत सर्वांशी चर्चा केली. सर्वानी एकमताने सर्व सूचनांचे व मार्गदर्शनाचे पालन करण्याबाबत सहमती दर्शवली असून आम्हीही आपल्याला योग्य ती मदत करणे बाबत आश्वासन दिले व हद्दीतील राबवलेल्या योजनांचे कौतुक केले.

# अपंग इसमाला मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा, सिद्धीकरवले येथे साठ वर्षीय अपंग इसमाला मारहाण केल्याप्रकरणी गोपीनाथ पाटील, प्रभाकर पाटील, शंकर पाटील यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिद्धी करवले येथील वासुदेव गोटीराम पाटील यांना एका डोळ्याने दिसत नाही. आणि ते अपंग आहेत. २८ मे रोजी ते त्यांच्या शेतात म्हशीला चरायला घेऊन गेले होते. त्यांच्या शेताच्या शेजारी गोपिनाथ रामा पाटील यांचे शेत आहे. त्याने त्यांच्या शेतात जेसीबी आणली होती. यावेळी वासुदेव यांनी शेताच्या बांधावर हद्दीची खूण म्हणून वाळलेली झाडाची फांदी लावलेली होती. गोपीनाथ पाटील याने ती फांदी काढून फेकण्यास सांगितली.

यावेळी वासुदेव यांनी ती फांदी काढू नको असे सांगितले असता गोपीनाथ पाटील यांनी वासुदेव पाटील यांना शिवीगाळ केली. आणि शेतातील दगड फेकून मारला. त्यानंतर प्रभाकर याने त्यांना खाली ढकलून काठीने मारहाण केली. तर शंकर पाटील याने वासुदेव यांच्या कानाखाली मारली. तळोजा पोलीस ठाणे गोपीनाथ पाटील, प्रभाकर पाटील, शंकर पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रभाग क्रमांक १७ मधील गरजू लोकांना अन्नधान्याचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पार्टी पनवेल याच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १७ मधील सेक्टर १३ नवीन पनवेल येथील गरजू लोकांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सभापती सुशिला जगदिश घरत, नगरसेवक अँड मनोज भुजबळ, नगरसेविका अँड वृषाली जितेंद्र वाघमारे, वॉर्ड अध्यक्ष विजय म्हात्रे, महिला मोर्चा शहर अध्यक्षा वर्षा नाईक, जगदीश घरत, अँड जितेंद्र वाघमारे, सचिन पाटील,जय बजरंग मित्र मंडळाचे अध्यक्ष विनोद वाघमारे, योगेश हाडगे, दुर्वेश शेटे, शोएल सैय्यद, अमोल घायाळ, अनिरूध्द कडवे, गुड्डू टाक, इत्यादी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक/भोगवटाधारक १) श्री.हिरा तुकाराम चोरघे, २) श्री.धनाजी तुकाराम चोरघे, ३) वनिता तुकाराम चोरघे, ४) धाकली तुकाराम चोरघे, रा.मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्श्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक/भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १०८ | ५ | जिरायत ०.२०.०० पो.ख. ०.०७.०० | ०.४७ |

तरी वर नमूद जमिनीवर/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक १) श्री.हिरा तुकाराम चोरघे, २) श्री.धनाजी तुकाराम चोरघे, ३) वनिता तुकाराम चोरघे, ४) धाकली तुकाराम चोरघे, यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३१/०५/२०२१

**सही/–**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्रं.२८, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**


# तळा तालुक्यातील महागांव प्रा.आ.केद्राला रुग्णवाहिका दाखल ; पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



**दै.रायगड नगरी । तळा**

ग्रामविकास व आरोग्य विभाग यांच्या माध्यमातून मिळालेल्या रूग्णवाहिकेचा जिल्ह्याच्या पालक मंत्री अदिती ताई तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा ३० मे रोजी करण्यात आला.

यावेळी सभापती अक्षरा कदम, महिला बालकल्याण सभापती गीताताई जाधव यांच्या उपस्थितीत पार पडला. डोगराळ, दुर्गम भागातील महागांव जनतेसाठी रुग्णवाहिकेची अत्यंत गरजेचे होती ही तालुक्यातील तालुक्याच्या विकासासाठी खा.सुनील तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांचे झुकते माप असते. यावेळी गटविकास अधिकारी, विलास यादव, नायब तहसीलदार निलेश गवाणकर, अॅड उत्तम जाधव, सचिन कदम, सरपंचा सुषमा कजबळे, नगरसेवक चंद्रकांत रोडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.वंदन पाटील, गणेश पवार, प्रवीण अंबार्ले आदि मान्यवर उपस्थित होते.

# कंटेनरच्या धडकेत ५० वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सायकल वरून प्रवास करताना मागून आलेल्या कंटेनरने जोरदार धडक दिल्याने ५० वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यु झाल्याची घटना सायन पनवेल महामार्गावर रविवारला पहाटे सहाच्या सुमारास घडली. मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव नितीन राजमल शहा वय( ५०) राहणार विलेपार्ले मुंबई येथील रहिवासी आहे.


## ग्रामपंचायत गोवठणे

**मु.गोवठणे, पो.आवरे, ता.उरण, जि.रायगड**

**जाहीर निविदा सन २०२१/२०२२**

प्रति,
अधिकृत/अनुभवी ठेकेदार

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गोवठणे हद्दीतील खाालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळविण्याकरिता अर्जाची तारीख दि.०१/०६/२०२१ ते ०८/०६/२०२१ पर्यंत या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत मिळतील.

सदर निविदा दि.०८/०६/२०२१ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील आणि सदर निविदा याच दिवशी कार्यालयीन वेळेत दि.१२.३० वाजता उघडण्यात येतील. कामाकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत गोठवणेच्या नावाने डिमांड ड्राफ्ट/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे, अगर नाकारणेचा संपूर्ण अधिकार ग्रामपंचायत गोठवणे यांनी राखून ठेवला आहे. इसारा रक्कम प्रथम/अंतिम देयकांमधून परस्पर कापून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कामांची नावे | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | ठेकेदाराचा वर्ग | निविदा किंमत | जीएसटी कपात १२% | S.Q.M. Checking चार्जेस | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोवठणे अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे | ५.०० लक्ष | ५०००.०० | २५०००.०० | अ ते क वर्ग | २००.०० | ५१४७१.०० | ४३००.०० | दि.०८/०६/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत |

शासनाच्या निकषांप्रमाणे अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–

१) कामाच्या प्रत्येक बिलांमधून नियमाप्रमाणे ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, ०.१५% आयकरावरील सरचार्ज, १% कामगार विमा, १२% जी.एस.टी., १% एस.क्यु.एम. चेकींग चार्जेस सरकारी चलनांद्वारे भरणा करून सदर चलनांची प्रत ग्रामपंचायतमध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

२) सदरची कामे ग्रामपंचायतीने दिलेल्या मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३) सदर कामाच्या निविदा परसेंटेंज दराने भरावयाच्या आहेत व तेच दर निविदेसाठी कायमस्वरुपी ग्राह्य धरण्यात येतील. सदर कामांचे निविदा अर्ज वरील कालावधीत कार्यालयीन वेळेत रु.२००.०० प्रती निविदा अर्ज दराने उपलब्ध आहेत. ग्रामपंचायतीच्या निविदा अर्जांव्यतिरिक्त अर्ज स्वीकारला जाणार नाही. तसेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील याची नोंद घ्यावी.

४) ग्रामपंचायतीने मागितलेल्या सर्वच कागदपत्रांचे सादरीकरण करणे आवश्यक आहे.

५) पॅनकार्ड, आयकर, जी.एस.टी., टि.डी.एस.च्या स्वसाक्षांकित झेरॉक्स/प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहेत.

६) सदर निविदा सन २०२१/२०२२ करिता मंजूर राहील.

७) सदर कामाचे अंदाजत्रक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही. दिलेली तारीख, वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच निविदेची किंमत नापरतावा राहील.

९) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार करण्यात येईल.

१०) वर्कऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदांकडून ग्रामपंचायतीने काम पूर्ण करून घेतल्यास होणाऱ्या नुकसानीस / खर्चास तसेच कार्यवाहीस ठेकेदार यांना स्वतः जबाबदार रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

११) तांत्रिक मुल्यांकनानुसार व निधी उपल्बधतेनुसारच सदरच्या कामांची देयके अदा केली जातील.

१२) निविदा मंजूर झाल्यास कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून ५ (पाच) दिवसांचे आत सुरू करणेचे बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

१३) सदरचे मंजुर काम हे ठेकेदाराने पंचायत समिती, उरण उपविभाग पनवेल (बांधकाम विभाग) यांचेकडील तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीने देखरेखीखली करावयाचे आहे.

१४) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. तसेच केलेल्या कामाचा दर्जा चांगला असल्याची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१५) काम पुर्ण करणे पुर्वीचा व काम सुरू (चालू) असतानाचा व काम संपूर्ण (पूर्ण) झाल्यानंतरचा रंगीत फोओ कॉपी सादर केल्याशिवाय अंतीम बिले दिली जाणार नाहीत. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करावयाचे आहे.

१६) विकासकामाचे बांधकाम पुर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे ठिकाणी (साईज ४×३) चौ.फूट आकाराचा लोखंडी बोर्ड बसविणेत यावा. बोर्ड न लावल्यास अंतिम बिल मिळणार नाही. बोर्ड लावत असलेबाबतचा फोटो सादर करणे बंधन कारक आहे

१७) मंजुर काम अंदाजपत्रकाप्रमाणेच करणेत यावे. कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम ठेकेदार यांनी केल्यास ग्रामपंचायतीकडून वाढीव रक्कम दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१८) एक किंवा सर्व निवीदा मंजूर / नामंजुर करणेचा अधिकार ग्रामपंचायत गोठवणे स्वत:कडे राखून ठेवत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

१९) सर्वात कमीत कमी निविदा दर सादर करणाऱ्या ठेकेदारांच्या प्राधान्य क्रमाने विचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२०) कामाचे आदेशपत्र होणेपूर्वी ठेकेदार यांनी एक लाखास शंभर याप्रमाणे इस्टीमेंट रक्कमेच्या प्रमाणे (प्रमाणात) मुद्रांक पेपर ग्रामपंचायतीकडे स्वतःच्या नावाने स्वतः सादर करणेची आहेत, याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे**
**ग्रामपंचायत गोवठणे**
**ता.उरण, जि.रायगड**

**सही/–**
**सरपंच**
**सौ.प्रणिता प्रदीप म्हात्रे**
**ग्रामपंचायत गोवठणे**
**ता.उरण, जि.रायगड**

